दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ६१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१ जून २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## आरसी इलेक्टॉनिक शोरूममध्ये घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील मिडलकल्लास सोसायटी मध्ये असलेल्या आरसी इलेक्टॉनिक शोरूम मध्ये झालेल्या घरफोडीत मोठ्या प्रमाणात इलेक्टॉनिक वस्तू व मोबाईल फोन चोरीस गेल्याचा प्रथमिक अंदाज आहे.

येथील वसंतस्मुती या सोसायटी मध्ये असलेल्या आरसी इलेक्टॉनिक शोरुमचे मुख्य दरवाज्याचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून आतील मोठ्या प्रमाणात इलेक्टॉनिक वस्तू व मोबाईल फोन चोरून नेल्याचे प्राथमिक माहिती समोर आले आहे. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिश ठाण्यातील गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी सदर ठिकाणी पोहचुन या संदर्भात अधिक घेत आहे.

# महाड येथे आईकडून पोटच्या सहा मुलांची हत्या

## आईला अटक ; चार दिवसांची पोलीस कोठडी



**दै.रायगड नगरी । महाड**

**आपल्या सहा मुलांना विहिरीत ढकलून जीवे मारणाऱ्या रूना सहानी या महिलेविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आली आहे. आज या महिलेला महाड येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता, तिला चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली. हे कृत्य या एकाच महिलेने केले आहे का, यासह विविध प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न पोलीस करित आहेत.**

रूना चिखुरी सहानी (वय ३०, रा. शेलटोली, ता. महाड, मूळ राहणार उत्तरप्रदेश असे हे दुष्कृत्य करणाऱ्या महिलेचे नाव आहे. सोमवारी सकाळी ती आपल्या सहा मुलांना घेऊन बाहेर पडली. या गावापासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या खरवली येथील एका शेतात असलेल्या विहिरीजवळ त्यांना घेऊन गेली. त्यानंतर एक एक करून आपल्या रोशनी (वय१०), करिश्मा (वय ८), रेश्मा (वय ६), विद्या (वय ५), रा छा (वय दिड वर्षे) या पाच मुली आणि शिवराज (वय ३) या मुलाला विहिरीमध्ये ढकलून दिले. त्यानंतर ही महिला त्याच ठिकाणी बसून राहिली. सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास या विहिरीचे मालक महादेव रामजी शिर्के हे या ठिकाणी आले असता, आपण आपल्या सहा मुलांना विहिरीत ढकलून दिल्याचे रूना हिने त्यांना सांगितले. त्यांचा प्रथम तिच्या सांगण्यावर विश्वास बसला नाही. यानंतर तिने शपथ घेवून आपण हे कृत्य केल्याचे सांगितल्यानंतर, महादेव शिर्के यांनी तिला घेवून महाड एमआयडीसी पोलीस ठाणे गाठले आणि पोलिसांना या प्रकाराची माहिती दिली.

माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक आंधळे यांनी आपल्या पथकासह या विहिरीकडे धाव घेत विहिरीत शोध घेतला. रात्री दहा वाजेपर्यंत सर्वच्या सर्व सहा मृतदेह बाहेर काढण्यात आले. महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक एम.एस.आंधळे, महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक मिलिंद खोपडे, तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक प्रदीप देशमुख यावेळेस उपस्थित होते. रायगडचे पोलीस अधिक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनीही रात्रीच घटनास्थळाला भेट देवून तपास कामी आवश्यक त्या सूचना दिल्या.

आज कोकण विभागाचे पोलीस महानिरिक्षक संजय मोहिते यांनीही एमआयडीसी पोलीस ठाण्याला भेट देवून घटनेची माहिती घेत, तपासाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या. या महिलेविरुद्ध भादंवि कलम ३०२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आज तिला न्यायालयासमोर हजर करण्यात आले. तिला चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस उपअधिक्षक निलेश तांबे अधिक तपास करित आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी साधला संवाद

### रायगड जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमांतर्गत विविध केंद्रीय योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांशी आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संवाद साधला. रायगड जिल्ह्यात या कार्यक्रमाचे दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून येथील पी.एन.पी नाट्यगृह येथे थेट प्रक्षेपण करण्यात आले.

यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे या ऑनलाईन तर अलिबाग येथील पी.एन.पी नाट्यगृहात आयोजित या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पनवेल महानगरपालिका महापौर डॉ.कविता चौतमोल, पनवेल महानगरपालिका आयुक्त डॉ.गणेश देशमुख, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अमित सानप, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी श्याम पोशट्टी, पनवेल महानगरपालिका उपायुक्त सचिन पवार, जिल्हा परिषद सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, जलजीवन मिशनचे कार्यकारी अभियंता सुधीर वेंगुर्ले कर, तहसिलदार विशाल दौंडकर, राष्ट्रीय सूचना व विज्ञान अधिकारी चिंतामणी मिश्रा, मुख्याधिकारी जीवन पाटील, अंगाई साळुंखे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक श्री.कुलकर्णी, विविध राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी तसेच इतर विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, विविध योजनांचे लाभार्थी उपस्थित होते.

दरम्यान, गरीब कल्याण संमेलन अंतर्गत सिमला येथे पंतप्रधानांच्या उपस्थित झालेल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण यावेळी करण्यात आले. यावेळी पंतप्रधानांनी देशभरातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. देशातील नागरिकांचा सन्मान, सुरक्षा, समृद्धी, कल्याणासाठी संकल्प करीत असल्याचे पंतप्रधानांनी यावेळी सांगितले. गेल्या आठ वर्षांत विविध योजनांच्या माध्यमातून देशातील सामान्य नागरिकांना कशा प्रकारे लाभ मिळाला आहे, याबाबत त्यांनी माहिती दिली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव .../२





## बोर्लीपंचतनला एसटीचा कारभार वाऱ्यावर



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर पर्यटनाला जोडलेली एकमेव मोठी बाजारपेठ तसेच तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या बोर्लीपंचतन शहरात अद्यापही बसस्थानक नाही. त्यामुळे येथे येणाऱ्या प्रवाशांनी थांबायचे कुठे, असा प्रश्न येथील ग्रामस्थांना भेडसावत आहे.

बोर्लीपंचतन शहरात असणारे बस स्थानक आठ महिन्यांपूर्वी अतिक्रमणमध्ये हटवण्यात आलं. परिणामी आता शाळा सुरू होणार आणि शेकडो विद्यार्थी व प्रवासी बसची वाट बघत रस्त्यावर ताटकळत उभे राहणार असल्याची चिंता पालक वर्गातून होत आहे. मागील कित्येक महिन्यापासून असलेली बसस्थानकाची मागणी अजुनपर्यंत पूर्ण झाली नाही. त्यामुळे आणखी बसस्थानकासाठी किती दिवस प्रतीक्षा करायची, असा प्रश्न येथील नागरिक तथा प्रवाशी करीत आहे.

बोर्लीपंचतन शहर श्रीवर्धन तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाण आहे. दिघी पोर्ट, आदगाव बीच, वेळास व प्रसिद्ध दिवेआगर पर्यटन स्थळ ही चारही ठिकाणे बोर्लीपंचतनच्या अवती–भोवती आहे. त्यामुळे बोर्लीपंचतनला विशेष महत्त्व आहे. दिघी व हरिहरेश्वर या दोन्ही तालुक्यातील टोकांतून कोणत्याही वस्तूंच्या खरेदीकरिता बोर्लीपंचतनला आल्याशिवाय पर्याय नाही. येथे ये–जा करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. बसस्थानकावरील गर्दीवरून या शहराचे महत्व कळते. शहराच्या परिसरातील ४० गावांना सुविधा मिळाव्यात .../२

## नवघर ग्रामस्थांना ५ जून पर्यंत पर्यायी मार्ग न दिल्यास ६ जूनला रेल्वे फाटकाजवळ आंदोलन करण्याचा इशारा



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील नवघर गावातून उरण – पनवेल मार्गावर जाण्यासाठी नवघरफाटा म्हणून कित्येक वर्षे नामांकित असलेल्या मार्गाकडे जाण्यासाठी नवघर, भेंडखळ, पागोटे व कुंडेगावसह उरण पूर्व विभागातील सर्वच नागरिकांना सोपा आणि सरळ मार्ग असलेला मार्ग उरण – खारकोपर या रेल्वे प्रकल्पाच्या रेल्वे रुळामुळे मागील काही दिसांपूर्वी बंद करण्यात आल्याने या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या वाहनचालक आणि पादचाऱ्यांना नवघर सर्कल – फुंडे कॉलेज असा मोठा वळसा घेऊन जावे लागत आहे.त्यामुळे या विभागातील नागरिकांची गैरसोय निर्माण झाली आहे.

सिडकोच्या माध्यमातून नव्याने साकारण्यात येत असलेल्या नवघर रेल्वे स्थानकाचे काम सुरू आहे. मात्र येथील नागरिकांनी सातत्याने मागणी करूनही त्याच प्रमाणे सिडकोला पत्रव्यवहार करून अनेक बैठका होऊनही नवघर ग्रामस्थांसाठी पर्यायी मार्गाबाबत सिडको कडून कोणत्याही प्रकारे ठोस अशी पावले उचलली जात नाहीत. त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये नाराजीचा सूर उगवत आहे.यासाठी ग्रामस्थांनी आत्ता सिडकोने ५ जून २०२२ आधी नवघर ग्रामस्थांसाठी पर्याय मार्गाबाबतचा मार्ग काढावा. अन्यता रेल्वेचे सुरू असलेल्या ठिकाणी ६ जून पासून आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

याच पर्यायी रस्त्याबाबत याआधी सिडकोचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समावेत ग्रामस्थांच्या झालेल्या बैठकीत या मार्गावरील पर्यायी रस्त्याची लेखी हमी देखील नवघर ग्रामस्थांना देण्यातआली होती. मात्र त्यानंतरही याबाबतच्या पुढच्या कोणत्याही हालचाली आजतागायत झालेल्या नाहीत.सिडकोला २५ मे २०२२ रोजी सिडकोच्या बेलापूर कार्यालयात पुन्हा एकदा ग्रामस्थांचे निवेदन देण्यात आले आहे. त्यानुसार सिडको अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष नवघर येथे उपस्थित राहून रेल्वे स्थानकाचे काम सुरू असल्याची पाहणी केली असता, ग्रामस्थांची मागणी योग्य असल्याने तशा प्रकारे अहवाल रेल्वेला पाठवीत असल्याचे सांगितले होते.

यावेळी नवघरचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, सुरेश तांडेल, एल.बी. पाटील,नवघर ग्रामपंचायतीचे उपसरपंच रवि वाजेकर, नवघर ग्रामस्थ .../२



# मुरुडच्या दस्तुरीनाक्यावरील धोकादायक मोरीचे काम अद्याप नाही

## पावसाळ्यात दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण ? स्थानिक नागरिकांचा सवाल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मागील दोन वर्षांपासून मुरुडच्या दस्तुरीनाक्यावरील धोकादायक मोरीचे काम अद्याप न झाल्याने पुन्हा यंदा पावसाळ्यात येथे एखादी दुर्घटना घडल्यास जिवित व वित्त हानी झाल्यास जबाबदार कोण ? असा सवाल नागरिकांतून विचारला जात असून दिल्लीतील क्राईम इन्व्हेस्टिगेशन बोर्ड ट्रस्टचे राज्य सचिव तथा व्हेंचर फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष तुफैल दामाद यांनी आपल्या सहका-यांसमवेत सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन पावसाळ्यापूर्वी येथील मोरीचे काम पुर्ण व्हावे.अशी अपेक्षा व्यक्त केली.

मुरुड-आगरदांडा रस्त्यालगत नगरपरिषद हद्दीत याठिकाणी पुर्वी पासून पावसाळ्यात पाणी जाण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मो-या(उघडी) बंद झालेल्या आहेत.यात सद्यस्थितीत एका बाजूने मोरीचा भाग बंद मुळे पाणी सा-चून, घरात घुसून आम्हा नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे.यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.मागील दोन वर्षांपासून याठिकाणी पुरजन्य परिस्थिती निर्माण होण्याचे मिळालेले संकेत वेळप्रसंगी महाड, चिपळूण मध्ये निर्माण झालेल्या पुरस्थिती सारखा फटका बसण्याची भिती व्यक्त होत आहे.याकरीता या मो-यांतील (उघडी) पाईप काढून कॉंक्रिटिकरण करण्यात यावे.तेलवडे ग्रामपंचायत हद्दीतील सत्याची नदीतील गाळ, साचलेले दगड,माती काढून साफ करण्यात यावी व मुरुड-आगरदांडा मुख्य रस्त्याला लागून नगरपरिषद अंतर्गत रस्ता कॉंक्रिटिकरण करण्यात यावा. अशी मागणी मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपकार्यकारी अभियंता यांचेकडे निवेदन देण्यात येऊन करण्यात होती.यावेळी स्थानिक नागरिकांच्या वतीने जन आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता तसेच दिल्ली येथील क्राईम इन्व्हेस्टिगेशन बोर्ड ट्रस्ट च्या तर्फे निवेदन देण्यात आले होते.याची सार्वजनिक बांधकाम खात्याने दखल घेऊन ग्रामस्थांच्या मागणीनुसार पुरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंडळ कार्यालयाकडून तांत्रिक मंजुरी मिळाली असल्याचे व सदर कामाची निविदाकरिता आवश्यक कार्यवाही या कार्यालयाकडून करण्यात आली आहे व सदर काम सद्यस्थितीत निविदा स्तरावर आहे.निविदा प्रक्रियेनंतर कंत्राटदार नेमल्यावर कामाला सुरुवात करण्यात येईल. असे सार्वजनिक बांधकाम खात्याचे उप विभागीय अधिकारी यांच्या कडून राष्ट्रीय अध्यक्ष मुनेंद्र चौधरी यांना कळविण्यात आले आहे. पावस-ाळा तोंडावर आला आहे.यंदा हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार कोकण किनारपट्टी सह राज्यात ९४ टक्के इशारा देण्यात आला आहे. असे असताना या ठिकाणी मागील दोन वर्षापासून तेलवडे मोरीचे काम रखडलेले असल्याने मागील पावसाळ्यात येथील नागरिकांना पुराच्या पाण्याने संकटांचा सामना करावा लागला होता.यंदा वेळेत मोरीचे काम न झाल्यास वेळप्रसंगी पुरामुळे अशी घटना घडल्यास, जिवित व वित्त हानीला सामोरे जावे लागल्यास याला जबाबदार कोण ? असा सवाल तुफैल दामाद यांनी उपस्थित केला आहे.

# व्ही.एल.म्हात्रे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**



रयत शिक्षण संस्थेचे, अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनिअर कॉलेज दापोली-पारगांव, ता.पनवेल या शाखेत कार्यरत असणारे व्ही.एल.म्हात्रे सर हे प्रदीर्घ सेवेनंतर आज दि.३१/०५/२०२२ रोजी सेवानिवृत्त झाले. म्हात्रे सर यांनी संस्थेमध्ये ३५ वर्षे ९ महिने सेवा करत असताना ते खऱ्या अर्थाने कर्मवीर अण्णांच्या विचाराने काम करीत होते. म्हात्रे सर हे बी.ए.बी.एड असल्याने ते समाजशास्त्र या विशयाचे अध्यापन होते.

म्हात्रे सर हे अध्यापनाचे काम करीत असताना संस्थेच्या व शासनाच्या विविध उपक्रमात त्यांचा नेहमी सहभाग असायचा. अशा विविध त्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांनी राजिप अलिबाग यांचा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार तसेच आंतरराष्ट्रीय मानवाधिकार परिषद रायगड, पनवेल तालुका टिचर्स असोसिएशन, रयत शिक्षण संस्था रायगड विभाग यांच्याकडून विविध पुरस्कार देवून गौरविण्यात आलेले आहे.

म्हात्रे सर यांना सेवानिवृत्तीपूर्वी प्राचार्या पुष्पलता ठाकूर यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी विद्यालयाच्या सौ.दमडे, ग्रंथपाल म्हात्रे, आर.ए.सर, सौ.सुप्रिया, सौ.चारुशिला, दर्शन, रमन भोईर, म्हात्रे पी.पी व पाटील ए.ए. उपस्थित होते. तसेच ॲड.विजया रा.म्हात्रे यांनीही व्ही.एल.म्हात्रे यांना सेवानिवृत्तनिमित्त शुभेच्छा दिल्या.

# उरण चारफाटा येथील मच्छिमार मार्केटचे भूमिपूजन



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हददीतील उरण चारफाटा मच्छिमार मार्केटचे भूमिपूजन काल आ. महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले.सिडकोच्या प्लानमध्ये द्रोणागिरीत मासळी मार्केट रिझर्वेशन आहे. हे पाहून दोन वर्षापूर्वी तत्कालीन सिडकोचे अध्यक्ष आ. प्रशांत ठाकूर असतांना सिडकोकडे मच्छिमार मार्केट संबधी प्रस्ताव देण्यात आला होता.

त्याचा नियमित पाठपुरावा करून त्याला यश आले आहे. सिडकोच्या माध्यमातून सुमारे दीड ते दोन कोटीचे मच्छी विक्रेत्यांसाठी सुसज्य व अद्यावत असे मच्छी मार्केट उभारण्यात येणार आहे.त्यांचे भूमिपूजन काल करण्यात आले आहे. एका वर्षात हे पूर्ण होईल आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे आपण करीत आहोत. असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी भूमिपूजन उद्घाटन प्रसंगी केले. या वेळी उरणच्या माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजपा उरण तालुका अध्यक्ष रवि भोईर, उरण शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह जिल्हा उपाध्यक्ष, नीलकंठ घरत, नगरसेवक राजेश ठाकूर, नगरसेविका दमयंती म्हात्रे, नगरसेविका जान्हवी पंडीत, उरण शहर महिला अध्यक्षा संपूर्णा थळी, नगरसेविका आशा शेलार, नगरसेविका रजनी कोळी, मच्छी विक्रेत्या महिला वर्ग भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते .

# कर्जत नगरपरिषद कार्यालयात महाराणी अहिल्याबाई होळकर जयंती निमित्त अभिवादन

**दै.रायगड नगरी । कर्जत**


महाराणी अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस आज नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी सुरेखा भणगे, गटनेते नितीन सावंत, विरोधी पक्षनेता शरद लाड, नगरसेवक राहुल डाळींबकर, विवेक दांडेकर, सोमनाथ ठोंबरे, उमेश गायकवाड, नगरसेविका प्राची डेरवणकर, विशाखा जिनगरे, भारती पालकर, मधुरा चंदन,सुवर्णा निलधे, पुष्पा दगडे, स्वामिनी मांजरे, अंतर्गत लेखापरीक्षक जितेंद्र गोसावी, नगर अभियंता मनीष गायकवाड, रवींद्र लाड, बापू बहिराम, सुदाम म्हसे, सुनील लाड, अविनाश पवार, निलेश निकाळजे,विलास गायकवाड, शेखर लोहकरे, सुदेश गायकवाड आदी उपस्थित होते.



# सुरभी रोडे यांना दंतचिकित्सक पदवी प्राप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**



सुरभी रोडे यांनी भारती विद्यापीठ खारघर येथून नुकतीच दंत चिकित्सक पदवी प्राप्त केली.

डॉ.सुरभी रोडे या महसूल खात्यातील संदीप रमाकांत रोडे यांच्या कन्या असून त्यांनी भारती विद्यापीठ खारघर येथे ४ वर्षाचा दंत चिकित्सक विभागाचा अभ्यासक्रम पूर्ण करून दंत वैद्यकीय पदवी प्राप्त केली आहे. मुळ गाव तळा येथील असणारे संदीप रोडे सध्या खारघर येथे आपल्या कुटुंबियांसमवेत राहत आहेत. आपल्याला मिळालेल्या या यशाचे संपूर्ण श्रेय सुरभी यांनी आपल्या आई सौ.समिधा संदीप रोडे यांना दिले असून मामा अमित यशवंत करंबे यांचे देखील आपल्या यशामध्ये महत्वाचे योगदान असल्याचे डॉ.सुरभी रोडे यांनी सांगितले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'ज्येष्ठ कीर्तनकार व प्रवचनकार' यांचा बुधवारी गौरव समारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचे आधारवड माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी पनवेलच्यावतीने बुधवार दिनांक ०१ जून रोजी सायंकाळी ०४ वाजता खांदा कॉलनीमधील श्रीकृपा हॉलमध्ये ईश्वर शक्तीच्या माध्यमातून पनवेल तालुक्यात समाजप्रबोधन करीत असलेल्या 'ज्येष्ठ कीर्तनकार व प्रवचनकार' यांचा गौरव समारंभ होणार आहे.

या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय यांची उपस्थिती लाभणार असून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे या समारंभाचे अध्यक्ष असणार आहेत. यावेळी राज्याचे माजी मंत्री संजय भेगडे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजप अध्यात्मिक सेलचे जिल्हा संयोजक काशिनाथ पारठे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी साधला संवाद

कार्यक्रमांतर्गत राज्याच्या ग्रामविकास विभागाने राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी विविध योजनांच्या औरंगाबाद, नाशिक, नागपूर, कोल्हापूर, अहमदनगर या जिल्ह्यातील लाभार्थ्यांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री श्री.ठाकरे यावेळी म्हणाले की, योजना केंद्राच्या असोत किंवा राज्यांच्या त्या सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी राज्याच्या यंत्रणेचे मोठे योगदान असते. हे प्रयत्न पक्षभेद विसरून आणि राजकारणविरहित झाले पाहिजेत. मला आनंद व समाधान आहे की, या योजना राज्य, जिल्हा, तालुका पातळीवर प्रशासकीय यंत्रणेने नियोजनपूर्वक लाभार्थ्यांपर्यंत यशस्वीरित्या पोहचविल्या. केवळ योजनांचा सुकाळ आणि अंमलबजावणीचा दुष्काळ असे चित्र महाराष्ट्रात नसून शेवटच्या घटकांपर्यंत अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच केंद्र सरकारच्या योजनांमध्ये राज्य सरकारचा ४० टक्के हिस्सा असल्याचेही मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी यावेळी स्पष्ट केले. राज्य शासनातर्फे केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विविध स्तरांवर कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनीदेखील विविध लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांना योजनांचा लाभ कसा मिळाला तसेच त्यांच्या आणखी काही अपेक्षा आहेत का ते जाणून घेतले. ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

रायगड जिल्ह्यात योजनांची प्रशासकीय यंत्रणांकडून जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या समन्वयाने प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, पुढील कालावधीत योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व इतर शासकीय रुग्णालय यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील आरोग्यसेवा आणखी बळकट करण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यावेळी म्हणाले की, विविध योजनांच्या माध्यमातून शासन जनतेपर्यंत पोहोचत आहे. जल जीवन मिशन, प्रधानमंत्री आवास योजना, मुद्रा योजना यासह विविध योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत माझी वसुंधरा मार्फत पर्यावरण बाबींची अनुषंगिक पूर्तता करण्यात येत आहे.

केंद्र सरकारने संपूर्ण भारत बलवान करण्याचे काम केले आहे. स्वच्छ भारत योजनेतंर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात बेघरांना घरे मिळावून दिली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत आल्याची माहिती पनवेल महानगरपालिका महापौर डॉ.कविता चौतमोल यांनी दिली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सांगितले की, जनतेच्या शाश्वत विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना असून, यामधून अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य यासह इतर आवश्यक सुविधा निर्माण केल्या जात आहेत. जिल्ह्यात घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन बाबत मोठ्या प्रमाणात कामे झाली आहेत. जिल्ह्यात ७७ टक्के कुटुंबांना वैयक्तिक नळ कनेक्शन देण्यात आले आहे. पंतप्रधान घरकुल योजनेअंतर्गत मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात घरकुलांचे निर्माण करण्यात आले. मागील वर्षभरात ३ हजार बचतगट निर्माण करून महिलांचे आर्थिक व सामाजिक बळकटीकरण करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.अमरदीप ठोंबरे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## बोर्लीपंचतनला एसटीचा कारभार वाऱ्यावर

या विचाराने आतातरी बसस्थान होईल, अशी आशा येथील नागरिक बाळगून आहेत.

याठिकाणी जिल्हा परिषद, महाविद्यालय व इंग्रजी माध्यमाच्या विविध शाळा आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना बोर्लीपंचतनला शिक्षण घेण्याकरिता आल्याशिवाय पर्याय नाही. शहराच्या वाढत्या महत्वानुसार येथे कित्येक वर्षापूर्वीच मोठे बसस्थानक होणे आवश्यक होते. मात्र, लोकप्रतिनिधींच्या अनास्थेमुळे ते होऊ शकले नाही. परिसरातील हजारो विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. ग्राहकांचा, विद्यार्थ्यांचा व प्रवाशांचा संबंध बसस्थानकाशी येतो. मात्र, येथे प्रवाशांना उभे राहण्यासाठी कोणतीच निवारा शेड नाही. प्रवास दरम्यान या सर्वांनी आसरा घ्यायचा कसा, असा प्रश्न पडतो. मागील अनेक वर्षांपासून त्रास सहन करीत बसची वाट बघावी लागते. आता ग्रामपंचायतच्या पुढाकाराने बसस्थानक होईल, अशी अपेक्षा आहे.

बोर्लीपंचतन येथील एसटी बसस्थानक पूर्वीच्याच जागेवर उभारण्यात यावे अशी मागणी मंगळवारी दिनांक ३१ रोजी ग्रामस्थांनी केली. त्यावेळी ग्रामसभेत तसा ठराव मंजूर करण्यात आला. महामंडळ व संबंधित प्रशासनाकडून त्याच जागेचे भूसंपादन करून लवकरात लवकर प्रवाशांना बसस्थानकाची सुविधा मिळावी अशी मागणी त्याचवेळी करण्यात आली. बोर्लीपंचतन शहरातुन मुंबईसह उपनगर, पुणे, सातारा, मिरज तसेच महाड, माणगाव इतर ग्रामीण भाग मिळून ३५ ते ४० एसटी ये - जा करतात मात्र, अशा महत्वाच्या ठिकाणी बसस्थानक नाही.

## ६ जूनला रेल्वे फाटकाजवळ आंदोलन करण्याचा इशारा

मंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पाटील,अविनाश म्हात्रे व मोतीराम डाके उपस्थित होते. परंतु सातत्याने निवेदने व बैठका होऊनही त्याच प्रमाणे पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतांनाही या नवघर ग्रामस्थांना तोंडी आश्वासना व्यतिरिक्त काही केले नाही. त्यामुळे या पर्यायी रस्त्याबाबत कोणतेही लेखी व ठोस निर्णय दिला जात नाही. त्याच प्रमाणे रहदारीचा रस्ता मोकळा केला जात नाही,त्यामुळे ५ जून २०२२ पर्यंत सिडको व रेल्वे अधिकाऱ्यां कडून न मिळाल्यास नवघर रेल्वे फाटकाजवळ ६ जून २०२२ जन आंदोलन करण्याचा निर्धार नवघर ग्रामस्थांनी केला आहे.


महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

Email : mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No.(02145) 222167

**निविदा सूचना क्रमांक १७ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनुक्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत म्हाप्रळ आंबेत पुरार रस्ता रा.मा.१०१ कि.मी. ०/०० ते ११/२०० मध्ये गटाराचे बांधकाम करणे. तालुका : माणगाव, जिल्हा : रायगड | १७३०३५१ | म.स.स. | ५६०/- | ३ महिने | म.स.स. |
| २ | रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत म्हाप्रळ आंबेत पुरार रस्ता रा.मा.१०१ कि.मी.३/०१० ते ३/०५० मध्ये डोंगराच्या बाजूने कमी उंचीची राखीव भिंत बांधणे आणि गटाराचे बांधकाम करणे. तालुका : माणगाव, जिल्हा : रायगड | १७१८४१० | म.स.स. | ५६०/- | ३ महिने | म.स.स. |
| ३ | रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत म्हाप्रळ आंबेत पुरार रस्ता रा.मा.१०१ कि.मी. ३/४०० ते ३४५५ मध्ये डोंगराच्या बाजूने कमी उंचीची राखीव भिंत बांधणे आणि गटाराचे बांधकाम करणे. तालुका : माणगाव, जिल्हा : रायगड | १३९३५६६ | म.स.स. | ५६०/- | ३ महिने | म.स.स. |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ३१/०५/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक १४/०६/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा : रायगड यांचे कार्यालयात दिनांक १६/०६/२०२२ वेळ ११.०० वाजता |

टिप : परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळावरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२४४४
दिनांक : २५/०५/२०२२

सही/-
(एम.आर.नामदे)
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

क्र.जिमाका/राअ/जाहि/३८/२०२२-२३


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रिटघर येथील महादेव गायकर सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिटघर येथील रायगड भूषण महादेव नारायण गायकर हे रयत शिक्षण संस्थेचे पजो म्हात्रे विद्यालय व ज्युनियर कॉलेज, आयटीआय नावडे येथे ३७ वर्षांची प्रदीर्घ सेवा करून ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले. या सेवा पुर्ती निमित्त सेवापूर्ती कार्यक्रम व सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली होती. यावेळी महादेव गायकर यांची मिरवणूक काढण्यात आली. तसेच आदिवासी वाडीतील महिलांना साडी वाटप करण्यात आले. व पोलीस पाटील दीपक पाटील व महादेव गायकर यांच्या तर्फे रिटघर गा–वात सामुदायिक कार्यात स्वयंपाक बनवणारयांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भजन व कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, ज्येष्ठ नेते जी आर पाटील, माजी सभापती काशिनाथ पाटील, एपीएमसी सभापती डॉ. दत्तात्रय पाटील, मुंबई एपीएमसी संचालक राजेंद्र पाटील, माजी तालुका चिटणीस नारायण घरत, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला आमदार बाळाराम पाटील, जी आर पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच महादेव गायकर यांनी आभार प्रदर्शन केले.

## मालाठे येथील जेष्ठ समाजसेवक महादेव लोखंडे यांचे आकस्मिक निधन


**दै.रायगड नगरी । तळा**

मालाठे बौद्धजन सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक, भारतीय बौध्द महासभा या धार्मिक संस्थेच्या तळा विभाग, ९ गाव ग्रुपचे माजी अध्यक्ष आणि लोखंडे परिवाराचे आधारस्तंभ दिवंगत महादेव लक्ष्मण लोखंडे यांचे गुरुवार, दि. २६ मे २०२२ रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी मालाठे येथे त्यांच्या राहत्या घरी आकस्मिक निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने लोखंडे परिवारामध्ये, मालाठे बौद्धजन सेवा संघ तसेच तळा तालुका बौद्ध समाजामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक शांत, संयमी आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व आकस्मिकरित्या निघून गेल्याने तळा तालुक्यामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, ३ मुलगे, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दिवंगत महादेव लोखंडे यांचा पुण्यानुमोदन आणि शोकसभा कार्यक्रम बुधवार, दि. १ जून रोजी त्यांचे मालाठे येथील राहत्या घरी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे असे त्यांचा मुलगा संतोष महादेव लोखंडे यांनी सांगितले आहे .

# दिव्यांग दाखल्यांचे शिबीर संपन्न, उत्स्फुर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील दिव्यांग, मतिमंद, मानसिक रुग्णांसाठी अलिबाग सिव्हिल हॉस्पिटलच्या सहकार्याने दाखला शिबिर आयोजित करण्यात आले होते. सुमारे १५८ जणांची तपासणी करण्यात आली. आणि सुमारे शंभर जणांना दाखल्याचे वाटप करण्यात आले. या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून काही तांत्रिक कारणांमुळे ज्या लाभार्थ्यांना लाभ घेता आला नाही. त्याच्यासाठी जून महिन्याच्या अखेरीस पुन्हा शिबीर आयोजित करण्यात येईल असे जाहीर करण्यात आले.



कर्जतच्या उप जिल्हा रुग्णालयात दिव्यांग दाखल्यांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी पुंडलिक पाटील, वैद्यकीय अधिक्षक डॉ. मनोज बनसोडे, वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक प्रतिमा फडतरे, दिव्यांग संस्थेचे अमर साळोखे, डॉ. वसंत भालशंकर, सविता पाटील, प्रसाद थोरवे, पंकज पाटील आदी उपस्थित होते. यावेळी आमदार थोरवे यांनी, 'यावेळचे शिबिर घाई घाईत होत आहे. त्यामुळे थोडी गैरसोय होण्याची शक्यता आहे. पुढील शिबिराची तारीख आठ – दहा दिवस आधी कळविल्यास नियोजन करण्यास वेळ मिळेल व लाभार्थींना दाखले वेळेत मिळू शकतील असे सूचित केले.

सुरुवातीला ऑन लाईन नोंदणी केलेल्यांचीच तपासणी करून दाखले देण्यात येतील. असे सांगितल्याने थोडासा गोंधळ झाला व आलेल्या रुग्णांना त्रास सहन करावा लागला. त्यांनतर ऑन लाईन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आणि मग सारे सुरळीत झाले. नोंदणी झाल्यानंतर अस्थी व्यंगत्व असलेल्यांची तपासणी डॉ. विक्रांत खंदाडे यांनी, मानसिक रुग्ण असलेल्यांची तपासणी मानसरोग तज्ञ डॉ. अर्चना सिंग , बालरोग तज्ञ डॉ. संजय गुडे, बिशक डॉ. अरुणा पोहरे, नंतर चिकित्सक डॉ. अजय इंगळे, फिजिओ थेरपिस्ट जोत्स्ना सरदार यांनी तपासणी केली. अर्धांग वायू झालेल्यांची तपासणी करण्यासाठी उपकरण उपलब्ध नसल्याने त्यांची तपासणी मुंबईतील के.ई. एम हॉस्पिटल आणि जे.जे. हॉस्पिटल मध्ये जाऊन करावी लागेल. असे सांगण्यात आले. वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक प्रतिमा फडतरे यांनी पुढील शिबिर नियोजनबद्ध करण्याचा 'शब्द' दिला. अपंग संस्थेच्या अमर साळोखे, अविनाश शहासने, पंकेश भोईर, राजेंद्र बदे, अरुण जोशी, धनाजी हडप आदींनी दिव्यांगांना सहकार्य केले.

## मासेमारी बंदी कालावधीत नौका किनाऱ्यावर

**दै.रायगड नगरी । मुरुड**

एक जून पासून सरकारने मासेमारी करता बंदी घातली असल्याकारणाने मुरुड बंदरामध्ये मच्छिमार बांधवांनी आपापल्या नौका शाकारण्यास सुरुवात केली असल्याने मुरुड समुद्र किनारा गजबजू लागला आहे. तालुक्यातील असंख्य नौका तब्बल दोन महिन्यांच्या विश्रांतीसाठी

जून–जुलै हा महिना माश्यांचा प्रजननाचा आणि अंडी देण्याचा कालावधी असल्याकारणाने या दोन महिन्यात माशांच्या उत्पादनात वाढ होत असते. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने मच्छिमारी करणारा मच्छीमार आपल्या नौका शाकारुन त्यांच्या डागडुजी करून पुन्हा मासेमारीसाठी सज्ज करीत असतो. शासनाच्या नियमानुसार १ जून ते ३१ जुलै मासेमारी व जलवाहतूक बंदी घा–तली असल्याकारणाने मच्छिमार या कालावधीत आपापल्या नौका किनाऱ्यावर शाकारतात. या दोन महिन्याच्या काळात ते आपल्या नौकांची दुरुस्ती, रंगरंगोटी व नविन जाळी तयार करणे, जुनी जाळी दुरुस्ती करणे या कामात व्यस्त असतात.

खरं तर दरवर्षी राज्यात १५ ऑगस्ट किंवा नारळी पौर्णिमेपैकी जो दिवस आधी येईल त्यादिवशी मासेमारीवरची बंदी उठवली जात असे पण इतर राज्यांतील बंदी १ ऑगस्ट रोजी उठत असल्याने परराज्यातील मच्छिमार या ठिकाणी येऊन मच्छिमारी करतात त्यामुळे स्थानिक मच्छीमारांना नुकसान सहन करावे लागते.

त्यामुळे देशभरात सर्व समुद्र किनारी १ जून ते ३१ जुलै या कालावधीत मच्छीमारी बंदी घातली आहे. जीवावर उदार होऊन मासेमारी करून आपली उपजीविका करणाऱ्या मासेमारांची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात संख्या आहे. या मासेमारी व्यवसायातून देशालामोठे परकीय चलन मिळते.



## शालेय वस्तू महागल्या ; पालकांच्या खिशाला मोठा फटका

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

१० जून नंतर सर्वत्र शाळा, कॉलेज सुरू होणार असून विद्यार्थी आता शाळा कधी सुरु होते आणि आम्ही आमच्या बाकावर कधी बसतो अशी कुतूहल आणि उत्सुकता विद्यार्थ्यांमध्ये आहे. मात्र या वर्षी असंख्य पालकांना शालेय वस्तू खरेदी करताना त्यांच्या खिशाला महागाईची मोठी झल बसणार आहे. एका बाजूला विद्यार्थी शाळेत जाण्यास उत्सुक आहेत तर दुसऱ्या बाजूला आपण एवढी महागडी वही, कंपास, रंगपेटी, छत्री, रेनकोट, शुज, दप्तर अशा अनेक शालेय वस्तूंच्या किंमती आता वाढल्या असल्यामुळे पालकांना याचा मोठा फटका बसणार आहे.

गेल्या दोन वर्षात कोरोनामुळे शाळेचा मेळ बसला नव्हता. शाळा बंद होत्या. अनेक दुकाने सुद्धा बंद होती. दुकानदारांना मोठी आर्थिक झळ सोसावी लागली होती. यामध्ये कोरोनामुळे अनेक पालकांच्या नोकऱ्या गेल्या यामुळे कुटूंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. यामध्ये भरीत भर म्हणून शाळेची फि व शालेय वस्तू महागल्यामुळे पालक वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

काही ठिकाणच्या शाळांमध्ये विशेषत: प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना शालेय गण–वेश दिला जातो. मात्र हायस्कूल कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना गणवेश खरेदी करावा लागतो. यावर्षी गणवेशाच्या किंमती ही वाढल्या आहेत. विद्यार्थी जरी शाळेत जाण्यासाठी उत्सुक असले तरी सामान्य माणूस वाढत्या महागाईने पुर्णपणे चिंताग्रस्त झाला आहे.

## पुर्वसुचना न देता पुन्हा बोर्ली ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोणतीही पुर्वसुचना न देता महावितरणने ऐन पावसाळ्याच्या सुरुवातीला मुरुड तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींसह बोर्ली ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांचा वीजपुरवठा दि.२६ मे पासून खंडित करण्यात आल्याने ग्रामस्थांतून तीव्र नाराजी व्यक्त होत असून पथदिव्यांचा वीजपुरवठा पुन्हा खंडित होण्यामागे महावितरण व ग्रामविकास खात्याची समन्वय साधण्यात निश्क्रियता कारणीभूत ठरत असून याचा त्रास सर्वसामान्य लोकांना सहन करावा लागतो आहे. अशी प्रतिक्रिया बोर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच चेतन जावसेन यांनी व्यक्त केली आहे.

ऐन पावसाळ्याच्या तोंडावर तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायतींच्या पथदिव्यांचा वीजपुरवठा कोणतीही पूर्व सुचना न देता बंद करण्यात आल्याने ग्रामस्थांना रात्रौ–अपरात्रौ विषारी साप आणि विंचू जीवजिवाणू पासून वेळप्रसंगी केव्हाही जिवितास धोका, अपघाताची शक्यता लक्षात घेऊन तातडीने पथदिव्यांचा वीजपुरवठा पुर्ववत सुरू राहाणे. अत्यंत गरजेचे आहे.

ग्रामपंचायतीचे पथदिवे सुरू राहाण्यात सरपंचांची महत्त्वाची भूमिका असून वीजबिलाच्या थकित वीजदेयकाची समस्या सोडवण्यात शासनाच्या महावितरण व ग्रामविकास खाते यांनी समन्वय साधून आपल्या पातळीवर प्रश्न सोडविणे गरजेचे आहे आणि जर पथदिव्यांची थकित वीज देयके ही ग्रामपंचायतींने अदा करणे अपेक्षित असेल तर तशा प्रकारचा आराखडा ग्रामपंचायतीकडे पाठविण्यात यावा व त्याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. परंतु तसे होत नसल्यानेच आपण ग्रामपंचायत पथदिव्यांचा वीजपुरवठा सुरळीत सुरू करण्यात हतबल झालो असल्याची भावना चेतन जावसेन यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली आहे.

## बाल गिर्यारोहक शनाया काळेने सर केला ठाणे जिल्ह्यातील ४००० फूट उंचावरील भैरवगड किल्ला

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील जिते – कुंभळमाच येथील मूळ रहिवासी असलेले व सध्या गोरेगाव (मुंबई) येथे वास्तव्यास असलेले नितेश काळे यांची सुकन्या बाल गिर्यारोहक शनाया काळे उर्फ चिऊताई ( वय ५ वर्षे ) हिने पुन्हा एकदा नाविन्यपूर्ण अशी कामगिरी करून दाखवली आहे. प्रत्येक ट्रेकर्सचे स्वप्नं असलेला कठीण आणि खडतर असा जवळपास ४००० फूट उंच अस–लेला चित्त थरारक ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटाच्या पायथ्याशी असलेला मोरोशी चा भैरवगड किल्ला चिमुकली शनाया काळे हिने यशस्वीरित्या सर करून कौतुकास्पद कामगिरी केली आहे. तिच्या या कामगिरी बाबत सर्व स्तरांवर तिचे अभिनंदन होत आहे. दरम्यान १२० फूट उंचीवरून zip line Rappelling पद्धतीचा वापर करून खाली उतरणारी शनाया काळे ही पहिली बाल गिर्यारोहक ठरली आहे.

या ट्रेकसाठी सुरक्षेच्या दृष्टीने पुरेपूर काळजी घेण्यात आली होती आणि हा ट्रेक बाल गिर्यारोहक शनाया काळे हिचा मामा सुरेश पोळेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आयोजित केला होता. याआधीही शनाया काळे हिने कठीण समजला जाणारा हरिहर किल्ला, आशिया खंडातील क्रमांक २ ची सर्वात मोठी व्हॅली – सांधण व्हॅली, कलावंतीण दुर्ग, स्वराज्याची राजधानी दुर्ग दुर्गेश्वर रायगड, स्वराज्याची पहिली राजधानी राजगड, कूर्डूगड, देवगड, त्याच प्रमाणे देवकुंड ट्रेक असे बरेचसे ट्रेक वयाच्या ५ व्या वर्षी सर केले आहेत. या कामगिरी बद्दल शनाया काळे हिस अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

## शनिवारी पनवेलमध्ये कुर्ररररर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचे आध–ारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल मधील अटल करंडक संयोजन समितीच्यावतीने शनिवार दिनांक ०४ जून रोजी पनवेलमध्ये 'कुर्ररररर' या नाट्य प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे.

लेखक प्रसाद खांडेकर दिग्दर्शित हे नाटक पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सायंकाळी ४.३० वाजता आहे.

यामध्ये प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, विशाखा सुभेदार, पंढरीनाथ कांबळे यांची प्रमुख भूमिका या नाटकात आहे.


### जाहीर नोटीस

**उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

On Admission

टेनन्सी अपिल क्र..../२०२२

१) श्री.काना अर्जून पाटील
रा.तळोजे मजकूर, पो.तळोजा पाचनंद, पनवेल — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.सोमेश्वर देवस्थान वहिवाटदार
श्री.दादू गोविंद पाटील
रा.तळोजे मजकूर, पो.तळोजा पाचनंद, पनवेल
२) अपर तहसीलदार, पनवेल — सामनेवाला

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील स.नं.७७/३ बाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७४ नुसार अप्पर तहसीलदार पनवेल शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल यांचेकडील दि.२८/१२/२०२१ रोजी झालेल्या आदेशाविरुद्ध अपिल या कार्यालयात दाखल केले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.३०/०६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ७७ | ३ | ०.२७.०० | ५.६२ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/०५/२०२२

सही/–
उपविभागीय अधिकारी पनवेल
उपविभाग पनवेल



### नवी मुंबई पोलीस आयुक्तालय सार्वजनिक मनोरंजनाच्या जागांना परवाना देणे नियम १९९९

**नमुना ''ब''**
**नियम ४ अन्वये**
**हरकती मागविण्यासाठी नोटीस**

ज्याअर्थी श्री कपल जयराम शेट्टी याचे ''मे जनता मित्र मंडळ सोशल वेलफेअर क्लब'' पत्ता : घर/शॉप नं.३७१, भिंगारी गाव, काळुंद्रे, पो.ओ.एन.जी.सी., ता.पनवेल, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे चतु:सिमा असलेल्या जागेवर स्थित असलेली कायमस्वरुपी जागा सार्वजनिक मनोरंजनाची जागा म्हणून वापरण्याकरिता परवाना मिळणेसाठी पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

१) पूर्व बाजू : ओएनजीसी स्क्रॅप गोडावून
२) पश्चिम बाजू : राहते घर
३) उत्तर बाजू : स्क्रॅप गोडावून/मोकळी जागा
४) दक्षिण बाजू : पीडब्ल्यूडी कार्यालय

त्याअर्थी याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, कोणत्याही व्यक्तीची ''सोशल क्लब परवाना'' देणेस हरकत असेल तर त्याने नोटीस प्रसिद्ध झाले दिनांकापासून १५ दिवसांच्या आत मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचेकडे आपली हरकत नोंदवावी. त्यानंतर मिळालेली कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दि.३१/०५/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी देण्यात येत आहे.

सही/–
(तनवीर शेख)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक परवाना शाखा,
पोलीस आयुक्त, नवी मुंबईकरिता



सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे–भेंडखळ, ता. उरण, जि. रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मूळ भूधारक **श्री. लक्ष्मण विनायक भगत** व इतर यांच्याकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसानभरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून, संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | निवाडा क्र. | संपादित सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर) | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| भेंडखळ/ संचिका क्र. ४४८ | भेंडखळ/ १६१ | १५१/४ब व वगैरे | ०-२६-६ | द्रोणागिरी | ५८ | १ | ४२५० प्रस्तावित |
| | भेंडखळ/ २१४/८३ | २७/२ व वगैरे | ०-७२-८ | | | | |
| | भेंडखळ/ १३३/८१ | ५२/३ व वगैरे | ०-६०-३ | | | | |
| | भेंडखळ/ १३२/८१ | १११/३ | ०-१६-३ | | | | |
| | भेंडखळ/ २१३/८३-८४ | १४३/० व वगैरे | २-२४-६ | | | | |
| | भेंडखळ/ १३६/८१ | १०६/७ व वगैरे | ०-५३-२ | | | | |
| | भेंडखळ/ ८७/८५-८६ | १६४/२ | ०-४-५ | | | | |
| | भेंडखळ/ २६४/८३ | ९१/१४ व वगैरे | ०-११-६ | | | | |
| | भेंडखळ/ १९/८१ | १००/११ | | | | | |
| | भेंडखळ/ २५७/८३ | ८४/५ब व वगैरे | २-६५-६ | | | | |
| | भेंडखळ/ १७६/८१ | ६१/६ | ०-१८-६ | | | | |
| | भेंडखळ/ ८६/८५-८६ | २४०/७ व वगैरे | | | | | |
| | **एकूण संपादित क्षेत्र** | | **७-५४-१** | | | | |

शासनाने घेतलेल्या निर्णयानूसार साडेबारा टक्के योजने अंर्तगत व द्रोणागिरी नोड येथे **भूखंड क्र.०१, सेक्टर–५८, क्षेत्र–४२५० चौ.मी.** भूखंडाचे इरादापत्र देण्यात आलेले आहे.

**निवाड्यानुसार व सी.सी. फॉर्म नूसार भूधारकांची नावे** – १) लक्ष्मण विनायक भगत २) देविदास विनायक भगत ३) श्रीमती मथुराबाई यादव ठाकुर ४) अनाबाई गिरीधर ठाकुर ५) सुमन लक्ष्मण भोईर ६) श्रीमती गुंजाबाई विनायक भगत ७) श्रीमती लिलाबाई राम भगत

तसेच १) श्रीमती मथुराबाई यादव ठाकुर २) श्रीमती अणाबाई उर्फ अनुबाई गिरीधर ठाकुर ३) सौ. मिना संतोष म्हात्रे यांनी सह दुय्यम निबंधक **उरण–५३३/२००८ दिनांक ११.०३.२००८ रोजी** यांच्याकडे हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ **१) श्री. लक्ष्मण विनायक भगत २) श्रीमती लिलाबाई राम भगत ३) किशोर राम भगत** यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहे. २००८ –२००९ साली सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट–१९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१०अ**' मधील **मूद्दा क्र. ii** अन्वये संबंधीत हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र., सेक्टर क्र. व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे हक्कसोडपत्रामध्ये इरादित **क्षेत्र–४२५० चौ.मी.** भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे–भेंडखळ सं.नं./हि.नं.–१५१/४बी व वगैरे एकूण क्षेत्र७–५४–१ हे.आर. या संपादित जमिनीचा उल्लेख केला आहे. (पृष्ठ क्र.१०९५/प ते १३५३/प)

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|
| १) मथुराबाई यादव ठाकुर<br>२) अणाबाई उर्फ अनुबाई यादव ठाकुर<br>३) मिना संतोष म्हात्रे | १) श्री. लक्ष्मण विनायक भगत<br>२) श्रीमती लिलाबाई राम भगत<br>३) किशोर राम भगत |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड नूसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे वाटप स्विकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|
| १) श्री. लक्ष्मण विनायक भगत<br>२) श्रीमती लिलाबाई राम भगत<br>३) किशोर राम भगत |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनूसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून (३०) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजनेंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधीत गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०९६/२०२२–२३

# संक्षिप्त...

## महानगरपालिकेच्या मुख्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज(३१ मे) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्ताने प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास उपायुक्त कल्पिता पिंपळे, जनसंपर्क विभाग प्रमुख कांतीलाल पाडवी, सामान्य विभाग प्रमुख दशरथ भंडारी,आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



## बाळसई येथे आर सीटीच्या माध्यमातून बचत गटांनी घेतले प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

संपुर्ण महाराष्ट्रासह रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बचत गट स्थापन करण्यात आले असुन या बचत गटांमार्फत महिलांनी मोठ्या प्रमाणात व्यवसाय व उद्योगांकडे एक चांगल्या पद्धतीने भरारी घेतली आहे. चुल व मुल याच्यावरच अवलंबून न राहता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याची वाटचाल महिलांनी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून नागोठण्याजवळील बाळसई येथील बचत गटांना आर सीटी च्या माध्यमातून २० ते २९ मे या दहा दिवसांमध्ये वेगवेगळे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. बाळसई गावात ५ बचतगट चांगल्या पद्धतीत कार्यरत असुन त्यांना भविष्यात आपल्या उद्योगधंद्यामध्ये चांगली वाटचाल करता यावी यासाठी स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (बँक ऑफ इंडिया पुरस्कृत ) तसेच उद्योजकता विकास साधना प्रेरणा प्रशिक्षणामार्फत वेगवेगळे पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी आर सी टी चे अलिबाग येथील आनंद राठोड, प्रसाद पाटील, प्रशिक्षक अनिता मोरे, मिना श्रीमाळी, सी.सी. नेहा पाटील, बँक सखी वर्षा जांबेकर, सी आर पी दिपाली गोळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या दहा दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये तांदळाचे पापड, पोहे पापड, नाचणीचे पापड, मिश्र डाळीचे सांडणे, साबुदाणा बटाटा पापड, जवळ्याचे पापड, चहा मसाला, दुध मसाला, चाट मसाला, सांबर मसाला, कांदा लसुण मसाला असे विविंध पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण बचत गटाच्या महिलांना देऊन त्यांच्याकडून हे पदार्थ बनवुन घेण्यात आले.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# पनवेल मनपाच्या नव्याने निर्माण होणाऱ्या शाळेचा नामकरण वाद

### नव्या इंग्रजी माध्यम शाळेला दिबांचे नाव द्यावे; तर जुन्या शाळेचे हु. हिरवे गुरुजींचे नाव कायम ठेवावे; स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटनेची भुमिका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्र. २ ला हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालय असे जे नाव आहे. तेच नाव पनवेल महानगरपालिकेतर्फे कन्या शाळेच्या जागेवर तयार केलेल्या शाळेला देण्यात यावे, जेणेकरून यापूर्वी जे विद्यार्थी हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालयात शिकत होते आणि ते शाळा सोडल्याचा दाखला घेऊन शाळा सोडून गेले आ-हेत त्यांना भविष्यात तांत्रिक अडचणी येऊ नयेत त्यामुळे पनवेल मनपातर्फे बांधण्यात आलेल्या शाळेला आत्ता आहे तेच म्हणजेच 'हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालय' हे नाव देण्याची मागणी स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटना तसेच हुतात्मा हिरवे गुरुजी यांचे उत्तराधिकारी ॲड. नागेश अरविंद हिरवे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिकेला निवेदन दिले आहे.

गोवा मुक्ती संग्रामात शहीद झालेले पन-वेलचे सुपुत्र 'हुतात्मा हिरवे गुरुजी' यांचा आदर समस्त पनवेलकरांच्या मनात आहे. हु. हिरवे गुरुजी हे त्यावेळी अखिल भारतीय शिक्षक संघटनेचे चिटणीस होते व शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासोबत चर्चा व वाटाघाटी करून शिक्षकांचे प्रश्न सोडवले होते. हु. हिरवे गुरुजी यांचे शैक्षणिक कार्य अलौकिक आहे. पनवेल हीच त्यांची कर्मभूमी होती.गोवा स्वातंत्र्य करण्यासाठी गोवा मुक्ती संग्रामात पनवेल मधून जे स्वातंत्र्य सैनिक गेले होते त्यांचे नेतृत्व हु. हिरवे गुरुजी यांनी केले होते. १५ ऑगस्ट १९५५ रोजी हु. गुरुजी हे गोव्यातील तेरेखोल किल्यावर आंदोलन करताना शहीद झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करताना पनवेल नगरपरिषदेने रीतसर ठराव घेऊन पनवेल नगरपालिकेच्या शाळा क्रमांक २ ला हु. हिरवे गुरुजी यांचे नाव दिले होते व आजही त्यांच्याच नावाने सदरची शाळा कार्यरत आहे. सदर हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालयात सन २०१८-१९ मध्ये १३३ विद्यार्थी व ४ शिक्षक कार्यरत होते.

पनवेल महापालिका शिक्षण विभागाच्या कन्या शाळा क्र. ३ येथील जागेवर शाळेसाठीच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. या इमारतीमध्ये १)सरस्वती विद्यामंदिर २)हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालय आणि ३)कन्या शाळा, अशा तीन शाळांचे एकत्रीकरण करून त्यांचे एकाच शाळेमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. तसेच यावर्षीपासून याठिकाणी पनवेल महापालिकेची इंग्रजी माध्यमाची शाळा देखील सुरू करण्यात येणार आहे. तीन शाळांचे एकाच शाळेमध्ये एकत्रीकरण होऊन नव्याने निर्माण होणाऱ्या मराठी माध्यमाच्या व प्रस्तावित इंग्रजी माध्यमाच्या शाळेसाठी नुकत्याच झालेल्या महासभेत दि. बा. पाटील मराठी माध्यम शाळा आणि दि. बा. पाटील इंग्रजी माध्यम शाळा हे नाव मंजूर करण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिकेतर्फे हुतात्मा हिरवे गुरुजी यांचे नाव डावलण्यात आले आहे. या शाळेला हु. हिरवे गुरुजींचे नाव देण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला होता. कारण शाळेला हु. हिरवे गुरुजी यांचे नाव दिल्यास यापुढेही त्यांच्या स्मृती समस्त पनवेलकरांच्या मनात अशाच जागृत राहतील आणि पनवेल महानगरपालिके तर्फे हु. हिरवे गुरुजी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केल्यासारखे होईल. पनवेल महानगरपालिकेने समस्त स्वातंत्र्यसैनिकांचा नेहमीच सन्मान केला आहे व करत आहे, असेही ॲड. नागेश अरविंद हिरवे यांनी म्हंटले आहे. दि. बा. पाटील साहेबांच्या नावाला आमचा कधीच विरोध नाही. महापालिका नव्याने निर्माण करीत असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेला लोकनेते दि. बा. पाटील साहेबांचे नाव जरूर द्यावे. परंतु ज्या तीन शाळांचे एकत्रीकरण होणार आहे त्या शाळेला पूर्वीचेच म्हणजेच हु. हिरवे गुरुजींचे नाव कायम राहावे. म्हणजेच याठिकाणी मराठी माध्यमाच्या शाळेला हु. हिरवे गुरुजी विद्यालय आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळेला लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय असे नाव राहावे. एकवेळ नवीन शाळेला नवीन नाव दिले तर वावगे नाही परंतु जे जुन्या शाळेचे नाव आहे ते पुसून नवीन नाव देऊ नये, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल असा ईशारा स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटना तसेच ॲड. नागेश हिरवे यांनी दिला आहे.

## अखेर शेणाटे प्रकरण भोवले ; भास्कर कारे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून हकालपट्टी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा येथील शेनाटे गावाजवळ दिनांक २३.०५.२०२२ रोजी दुपारी साधारण १२.०० वाजण्याच्या सुमारास दिनेश बटावले यांना रिक्षा घेऊन जाताना जबर मारहाण करण्यात आली होती. ते गंभीर जखमी असल्याने त्यांना मुंबई येथे तातडीने हलवण्यात आले होते. मारहाणी मुळे त्यांची तब्येत जास्त खालवल्याने त्यांची मृत्युशी चालली झुंज अपयशी ठरली आणि त्यांचा मुंबईत मृत्यू झाला. यातील एक बाब महत्वाची आहे ती म्हणजे त्यांचा मृत्यू पूर्वीचा मुंबईतील जवाब, त्या जवाबत माझ्यावर चार जणांनी हल्ला केला होता. मी शेनाटे ते तळा असा प्रवास करत असताना चौघानीं म्हणजे गणेश बटावले, भास्कर कारे, रुपेश बटावले आणि राकेश बटावले यांनी माझ्यावर हल्ला केला आणि मला स्मशानाजवळ नेऊन बरीच मारहाण केली. त्यांच्या जवळ असलेल्या लोखंडी रॉड, लाकूड, दगडाने माझ्या डोक्यात, छातीवर, पायावर दुखापत केली. अजून बरीचशी सविस्तर माहिती मरणापूर्वीच्या जवाबत दिनेशने नोंदवली आहे. त्यातील दोन आरोपी भास्कर कारे आणि राकेश बटावले अद्यापही फरार आहेत. या दोन्ही आरोपीना पकडण्यात आजून पोलीसांना अपयश आले आहे. आज आठ दिवस उलटून देखील भास्कर कारे आणि त्याचे साथीदार फरार असल्याने पोलिसांसमोर नवीन आव्हान उभे राहिले आहे.



भास्कर कारे हे राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते होते. त्यांच्यावर असलेल्या आरोपांमुळे पक्षाची बदनामी होत होती आज राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पत्रकार परिषद घेऊन भास्कर कारे यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे याची अधिकृत घोषणा तळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष नाना भौड यांनी केली आहे. दिनेश बटावले याचे आर-ोपी अद्याप फरार आहेत त्यांना लवकरात लवकर पकडण्यात यावे असे लेखी पत्र वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देणार असल्याचं त्यांनी या पत्रकार परिषदेत सांगितले. या पत्रकार परिषदेत नाना भौड, मागासवर्गीय सेल रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड.उत्तम जाधव, समन्वय समिती अध्यक्ष चंद्रकांत राऊत, कैलास पायगुडे, किशोर शिंदे, तन्वीर पल्लवकार आणि शेनाटे ग्रामस्थ उपस्थित होते. भास्कर कारे यांनी स्वराज्य प्रतिष्ठान या नावाने एक संघटना स्थापन केली होती या संघटनेचे जाळे बऱ्यापैकी तळा तालुक्यात पसरले होते,भास्कर कारे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून जरी हकालपट्टी करण्यात आली असली तरी त्यांना अटक करण्यात पोलिस अधिकारी का दीरंगाई करत आहेत असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे.

## लोखंडी पुल अन् नळपाईपलाईन चोरीप्रकरणी सर्वश्रृत आरोपींना अटक करण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायतीच्या अखत्यारीतील सावंतकोंड पार्टेकोंडदरम्यानचा जुना लोखंडी पुल दोन महिन्यांपूर्वी चोरीला गेल्यानंतर एफआयआर दाखल झाली. मात्र, सर्वश्रृत चोरांना अटक करण्यात चालढकल होऊन या लोखंडी पुलाचे भग्नावशेष घटनास्थळी टाकण्यात आले. त्यानंतर काँग्रेस शहरअध्यक्ष अमोल भुवड यांनी या प्रकरणी आरोपींना अटकेच्या मागणीसाठी उपो-षणाचा इशारा दिल्यानंतर सोमवारी याच सावंतकोंड पार्टेकोंड प्रभाग क्रमांक १ मधील नळपाईपलाईन कापून चोरीला गेल्याने अमोल भुवड यांनी आता येत्या दि. ४ जून रोजी उपोषणास बसण्याचा निर्धार पोलादपूर पोलीस ठाण्यासह रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड जिल्हाधिकारी, महाड प्रांताधिकारी आणि पोलादपूर तहसिलदार यांनाही दिला आहे.

पोलादपूर तालुक्यातील जुन्या व नव्या लोखंडी चीजवस्तूंच्या चोरीसाठी भंगारमाफियांनी राजकीय व्यक्तींच्या मदतीने जोरदार मोहिम उघडली असून पोलादपूर तालुक्यात झालेल्या विकासकामांतील चोऱ्यांबाबत कोणताही आवाज उठविला जात नव्हता. दोन महिन्यांपूर्वी ४ ते ७ एप्रिल दरम्यान पोलादपूर शहरातील सावंतकोंड ते पार्टेकोंडदरम्यानचा साध-ारणपणे ५०ते ६० फूट लांबीचा व ८ फूट रूंदीचा लोखंडी पुल कापून चोरण्यात आल्याप्रकरणी काँग्रेस पक्षाचे विरोधीगटाचे नगरसेवक आक्रमक झाले. या चोरीमध्ये विद्यमान लोकप्रतिनिधींचा समावेश असल्याचा आरोप यावेळी विरोधी गटाकडून उघडउघड होऊ लागला.

या सर्वश्रृत चोरांविरूध्द कायदेशीर कारवाई होण्यासाठी पोलादपूर शहर काँग्रेस अध्यक्ष अमोल भुवड यांनी नुकताच दि. २१ मे रोजी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला असताना दोनच दिवसांत दि. २३ मे रोजी याच सावंतकोंड पार्टेकोंड प्रभाग क्रमांक १ मधील नळपाईपलाईन कापून चोरी करण्यात आल्याची घटना उघडकीस आल्याने संतप्त काँग्रेसजनांनी याप्रकरणी लोखंडी पुल आणि नळपाणी योजनेचे पाईप चोरणाऱ्यांना तातडीने अटक न केल्यास येत्या शनिवार, दि. ४ जून २०२२ रोजी पोलादपूर पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करण्याचा निर्धार केला असून शहर अध्यक्ष अमोल भुवड हे स्वत: उपोषण करून पोलीस तसेच प्रशासनाचे लक्ष वेधून घेणार असल्याचे पोलादपूर शहर काँग्रेस अध्यक्ष अमोल भुवड यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकामध्ये नमूद केले आहे.

## सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्ष १ जून ते 30 सप्टेंबर २०२२ या कालावधीत २४×७ तत्त्वावर राहणार कार्यरत

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडको महामंडळाचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष १ जून ते ३० सप्टेंबर २०२२ या पावसाळी कालावधीमध्ये २४×७ तत्त्वावर कार्यरत असणार आहे. दरवर्षी पावसाळी कालावधीमध्ये सिडकोतर्फे नवी मुंबईतील सिडको अधिकार क्षेत्रातील नागरिकांकरिता आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येतो. पावसाळ्याच्या कालावधीमध्ये उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्ती/दुर्घटना लक्षात घेता जून ते सप्टेंबर या कालावधीत सिडकोचा सुसज्ज असा आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यरत असतो.

सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन इमारतीच्या तळ मजल्यावर असलेला हा नियंत्रण कक्ष कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसहित शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही २४ तास कार्यरत राहणार आहे. या कक्षामार्फत आपत्कालीन स्थितीत अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आदी महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी २४ तास संपर्कात असतील.

सिडकोच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाद्वारे वृक्षांची पडझड/वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची छाटणी, रस्त्यावरील उघड्या गटारांची झाकणे पूर्ववत बसवणे, पूर/पूरसदृश परिस्थिती, रस्त्यांवरील खड्डे, रस्ते वा नाल्याजवळ साचलेला कचरा, व्यक्तींचे पाणीसाठ्याच्या ठिकाणी बुडणे, आग व आगीचे विविध प्रकार, साथीचे रोग, विषारी प्राणी चावण्यासंबंधी बाबी, इमारत कोसळणे, भूस्खलन, पाणी साचणे या आपत्तींची दखल घेण्यात येऊन त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल.

नागरिकांनी वरीलपैकी कोणतीही आपत्ती उद्भवल्यास पुढे देण्यात आलेल्या दूरध्वनी अथवा व्हॉटसप क्रमांकावर किंवा ई-मेलद्वारे सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून आपत्तीसंबंधी माहिती द्यावी किंवा त्याबाबतची तक्रार नोंदवावी.

१. दूरध्वनी क्र. ०२२-६७९१ ८३८३/८३८४/८३८५, २७५६२९९९, २. टोल फ्री क्र. १८००२२६७९१ ३. व्हॉटसप क्र. ८८७९४५०४५०, ४. फॅक्स क्र. ०२२-६७९१८१९९, ५. ई-मेल eoccidcoindia.com

पनवेल महानगरपालिकेला हस्तातंरीत केलेल्या क्षेत्रासाठी आपत्कालीन नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमांक : १. दूरध्वनी क्र. ०२२-२७४६१५००/२७४५८०४०/४१/४२, २. टोल फ्री क्र.१८००२७७०१, ३. व्हॉटसॲप क्र. ९७६९०१२०१२ नागरिकांमार्फत फोनवरून अथवा व्हॉट्सपवरून माहिती अथवा तक्रार प्राप्त झाल्यावर नियंत्रण कक्षातील अधिकारी तातडीने निर्णय घेऊन ज्या नोडमध्ये सदर घटना घडली असेल तेथील प्रमुख अधिकाऱ्यास घटनेसंबंधी माहिती कळवतील व त्यासंबंधी योग्य ते मार्गदर्शन करतील. तसेच नियंत्रण कक्ष आवश्यक असलेल्या अग्निशमन केंद्र, हॉस्पिटल, वाहतूक पोलीस, स्थानिक पोलीस अशा संबंधित विभागाशी तातडीने संपर्क साधून घटनास्थळी आवश्यक ती मदत ताबडतोब पोहोचविण्याची दक्षता घेईल. नागरी संरक्षण दल तसेच सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक यांचेही सहकार्य याकामी घेण्यात येणार आहे. नोडल अधिकारी, सर्व संबंधित सिडकोचे विभाग, तसेच इतर शासकीय विभाग यांच्याशी समन्वय साधण्याची महत्वाची भूमिका हा नियंत्रण कक्ष पार पाडेल. त्या घटनेसंबंधी केलेल्या कारवाईची माहिती व सद्यस्थिती नोडल अधिकारी नियंत्रण कक्षास पुरवणार आहेत. सदर माहिती नियंत्रण कक्षाकडून संपर्क साधलेल्या नागरिकांना दिली जाईल.

दगडखाणी आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या जागांवर धोक्याच्या सूचना देणारे फलक लावण्यात येणार आहेत. अपघातप्रवण जागांवर सिडकोचे सुरक्षा रक्षक तैनात ठेवले जाणार आहेत. तसेच धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येत आहे. अतिवृष्टीच्या वेळी पाणी साठल्यास पाण्याचा उपसा करणारी यंत्रसामुग्री २४ तास उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

हिंदुस्थानात असे एकही महत्त्वाचे तीर्थक्षेत्र नाही की जिथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी मंदिरे बांधली नाहीत अथवा त्यांचा जीर्णोद्धार केला नाही.. मोठ्या प्रमाणात अहिल्यादेवी यांनी शिवमंदिराचा जीर्णोद्धार केला.



तितकेच पवित्र नद्याच्या तीरी घाट बांधले. सोमनाथापासून ते काशीविश्वेश्वरां पर्यंतची हिंदूंच्या आस्थेची पवित्र धार्मिकस्थळे परकीय आक्रतांनी मोडली ती पुन्हा राजमाता अहिल्यादेवींच्या पुढाकाराने उभी राहिली आशा हिंदुधर्म जीर्णोद्धारक राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जयंती निमित्त महात्मा गांधी मार्गावरील सामाजिक कार्यकर्ते राकेश कोकळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौकातील नामफलकास माथेरान नगरपरिषदेच्या प्रशासक, मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तर माजी नगरसेवक शिवाजी शिंदेंच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले. यावेळी अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन करण्यासाठी धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे, उपाध्यक्ष शैलेश ढेबे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, संतोष लखन, संतोष आखाडे, रामचंद्र ढेबे, मारुती कोकळे, दीपेश ढेबे, करन जानकर, गोविंद बावदाने, रामा आखाडे, झिमा आखाडे, गंगाराम गोरे, राहुल ढेबे, विशाल ढेबे तसेच धनगर समाजाचे असंख्य सदस्य, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर इंदिरा गांधी नगरा-तील धनगर समाजाच्या मंदिरात अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला रामचंद्र ढेबे, धोंडू जानकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तर जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते संतोष आखाडे यांनी श्रीफळ वाढविले. अहिल्याबाई होळकर यांनी केवळ एकाच समाजासाठी कार्य केलेले नसून तळागाळातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अखंडपणे आपले जीवन व्यथित केले होते. प्रत्येक घरात अशा अहिल्याबाई होळकर जन्माला यायला हव्यात तेव्हाच आपला देश खऱ्या अर्थाने प्रगतीपथावर जाईल. असे प्रशासक सुरेखा भणगे यांनी आपले अनमोल विचार यानिमित्ताने व्यक्त केले.

## म्हसळ्यात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत २८ प्रकरणे मंजूर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात संजय गांधी निराधार अन-ुदान योजना समितीची बैठक दिनांक ३० मे रोजी तहसिलदार म्हसळा यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती.



संजय गांधी निराधार अनुदान योजना सर्वसाधारण, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना अंतर्गत महा ई सेवा केंद्रामार्फत ऑनलाईन व्दारे प्राप्त झालेले परिपूर्ण अर्जाची छाननी करणेत आली असून ते अर्ज मंजूरीसाठी समितीकडे सादर करणेत आले होते, यावेळी विविध योजनांचे एकुण ३२ अर्ज प्राप्त झाले होते यांपैकी परिपूर्ण २८ अर्ज मंजूर करण्यात आले असून ०४ अर्ज काही कारणास्तव नामंजूर करणेत आले.

सभेदरम्यान संजय गांधी निराधार अनुदान योजना सर्वसाधारण - १४ अर्ज, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना - १० अर्ज, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना (अनुसूचित जाती) - ०१ अर्ज, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना - ०२ अर्ज, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना - ०१ अर्ज असे एकूण २८ अर्ज मंजूर करण्यात आले असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष महेश शिर्के यांनी दिली आहे. तसेच तालुक्यातील जे पात्र लाभार्थी आहेत त्यांनी संगायो निराधार पेन्शन योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी गावागावात सर्व माध्यमातून अधिकपणे प्रचार व प्रसार करण्यात येईल असे अध्यक्ष महेश शिर्के यांनी सांगितले.

तालुक्यातील सुरई, गोंडघर, म्हसळा शहर, रुद्रवट, काळसुरी, गायरोणे, सकलप, खरसई, पाभरे, देवघर कोंड, खामगाव, तोंडसुरे, साळवींडे, मेंदडी, मांदाटणे, घोणसे, निगडी, बंडवाडी, कणघर, आगरवाडा, चिरगाव, सांगवड, या गावांतील लाभार्थ्यांनी विहित नमुन्यात अर्ज सादर केले होते.

संगायो योजने अंतर्गत प्राप्त झालेले लाभार्थी यांचे अर्ज मंजूर करण्यात येऊन सदर लाभार्थी यांना माहे जून २०२२ पासून शासन नियमानुसार देय होणारे अनुदानाचे लाभ देणेत यावेत असे अध्यक्ष यांनी निर्देश दिले. तसेच तहसिलदार म्हसळा, गटविकास अधिकारी म्हसळा यांनी त्यांचे अधिनिस्त असलेले सर्व ग्रामसेवक यांना त्यांचे ग्रामपंचायत क्षेत्रात संजय गांधी निराधार अनुदान योजना सर्वसाधारण, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना इत्यादी योजनांचे निकषांची पूर्तता होत अस-लेले परंतु अद्याप पर्यंत त्यांना त्या योजनांबाबत माहिती नसल्याने ते अर्ज करु शकलेले नाहीत अशा लाभार्थी यांना तहसिल कार्यालयाकडे अर्ज सादर करणेबाबत सुचना देणेत येतील असे सांगितले. उपस्थित सर्वांचे अमर ठमके, संगायो महसुल सहाय्यक यांनी आभार मानले.